**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या दशकपूर्ती निमित्त प्रधानमंत्र्यांचा निवडक लाभार्थ्यांशी संवाद

- काश्मीरमधे ३ संघटना विघटनवादी हुरियत कॉन्फरन्स पासून वेगळ्या निघाल्या हे जनतेच्या संविधानावरच्या विश्वासाचं निदर्शक असल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन

- भारतीय रिझर्व्ह बँकेला ग्लोबल फायनान्सचा नवोन्मेषी आर्थिक संस्था पुरस्कार जाहीर

- अमेरिकेच्या टॅरिफ घोषणांनंतर पडलेल्या आशियाई शेअर बाजारांचे निर्देशांक सावरले

**आणि**

- २००८ मध्ये मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यातला आरोपी तहव्वूर राणाच्या प्रत्यापर्णाचा मार्ग मोकळा

**<><><><><><>**

होतकरु तरुणांमधे उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्रसरकारनं सुरु केलेल्या प्रधानमंत्री मुद्रा योजनेला आज दहा वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज त्यांच्या निवासस्थानी योजनेच्या लाभार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी विविध लाभार्थ्यांनी उद्योजकतेचे अनुभव सांगितले. देशातल्या तरुणांना सक्षम, स्वावलंबी करणं आणि त्यांना आत्मविश्वास मिळवून देणं तसंच केवळ नोकरी शोधणाऱ्यांऐवजी रोजगार निर्माण करण्याची क्षमता निर्माण करणं हे या योजनेचं उद्दिष्ट असल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे. लाभार्थ्यांपैकी निम्मे

अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसी प्रवर्गातले असून ७० टक्क्यांहून अधिक लाभार्थी महिला आहेत. मुद्रा योजनेअंतर्गत तामिळनाडूमध्ये सर्वाधिक कर्जवाटप झालं असून त्याखालोखाल उत्तर प्रदेश आणि कर्नाटकचा क्रमांक लागतो तर केंद्रशासित प्रदेशांमध्ये जम्मू-काश्मीर आघाडीवर आहे. मुद्रा योजनेला आंतरराष्ट्रीय स्तरावरही मान्यता मिळाली असून आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं भारताच्या सर्वसमावेशक उद्योजकतेला चालना देण्याच्या भूमिकेचं कौतुक केलं आहे. गेल्या दहा वर्षांत या योजनेअंतर्गत ५२ कोटींहून अधिक रकमेचं कर्ज मंजूर करण्यात आलं आहे. प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत सूक्ष्म आणि लघु उद्योगांना २० लाख रुपयांपर्यंत विनातारण कर्ज दिलं जातं.

**<><><><><><>**

महिला आणि बालविकास मंत्रालयाच्या पोषण पंधरवड्याच्या सातव्या आवृत्तीची सुरुवात आजपासून होत आहे. या वर्षीचा पोषण पंधरवडा चार विषयांवर आधारित आहे. नवजात अर्भकांच्या पहिल्या १ हजार दिवसांमधलं संगोपन, पोषण ट्रॅकर योजनेच्या लाभार्थ्यांविषयी माहिती देणं, कुपोषणावरच्या उपायांचं प्रभावी व्यवस्थापन आणि लहान वयातला लठ्ठपणा दूर करण्यासाठी निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देणं, या चार विषयांवर यंदाचा पोषण पंधरवडा साजरा होणार आहे. या उपक्रमाची सुरुवात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली असून या उपक्रमाचं उद्दिष्ट गर्भवती महिला, स्तन्यदा माता, किशोरवयीन मुली आणि सहा वर्षांखालच्या मुलांच्या योग्य पोषणावर भर असा आहे.

**<><><><><><>**

काश्मीरमधे ३ संघटना विघटनवादी हुरियत कॉन्फरन्स पासून वेगळ्या निघाल्या हे जनतेच्या संविधानावरच्या विश्वासाचं निदर्शक असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. अमित शाह तीन दिवसांच्या जम्मू काश्मीर दौऱ्यावर आहेत. आतापर्यंत अशा ११ संघटनांनी

विघटनवादी भूमिका सोडून मुख्य प्रवाहात सामील होण्याचा निर्णय घेतला आहे. शाह यांनी काल भारत पाकिस्तान सीमेजवळच्या एका लष्करी चौकीला भेट दिली आणि परिस्थितीचा आढावा घेतला. नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांच्या समवेत त्यांनी उच्चस्तरीय बैठकही घेतली.

**<><><><><>**

काँग्रेसच्या केंद्रीय कार्यकारिणीची बैठक आज गुजरातमध्ये अहमदाबादच्या सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय स्मारकात होत आहे. अखिल भारतीय काँग्रेसचं अधिवेशन उद्या साबरमती नदीच्या काठावर होणार आहे. काँग्रेसचे माध्यम आणि प्रसार विभागाचे अध्यक्ष पवन खेडा यांनी काल ही माहिती दिली. देशभरातून या अधिवेशनाला ३ हजार प्रतिनिधींसह काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

वेव्हज परिषदेच्या माध्यमातून देशात गुंतवणुकीसाठी जगभरातले गुंतवणूकदार भारतात येणार असल्याचं माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. नवी दिल्लीत ते वार्ताहरांशी बोलत होते. डिजिटल इंडियामुळे अनेक तंत्रज्ञान सुलभतेनं देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचलं आहे. त्यामुळे देशात मोठ्या प्रमाणात डिजिटल कंटेटची निर्मिती होत असल्याचं ते म्हणाले. एक ते चार मे दरम्यान मुंबईत ही परिषद होणार आहे.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेची निवड ग्लोबल फायनान्स या अर्थविषयक मासिकाने जागतिक पातळीवर सर्वात नवोन्मेषी आर्थिक संस्था म्हणून केली आहे. आर्थिक क्षेत्रात सातत्यानं नाविन्यपूर्ण काम करणाऱ्या संस्थांना हा पुरस्कार दिला जातो. कर्जाची प्रक्रिया सुलभ करणाऱ्या रिझर्व्ह बँकेच्या ‘युनिफाईड लेंडिंग इंटरफेस’मुळे

हा पुरस्कार मिळाल्याची, तसंच हा पुरस्कार मिळवणारी आरबीआय ही पहिलीच मध्यवर्ती बँक असल्याची माहिती रिझर्व्ह बँकेनं समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये दिली आहे.

<><><><><>

अमेरिकेने आकारलेल्या कराचे तीव्र परिणाम काल जगभरातल्या शेअर बाजारांवर जाणवले. मात्र आज आशियाई शेअर बाजारात तेजी आली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि जपानचे प्रधानमंत्री शिगेरी इशिबा यांनी काल व्यापार चर्चा सुरू करण्यासाठी सहमती दर्शवल्यानंतर जपानचा निक्केई हा निर्देशांक ६ पूर्णांक ४१ शतांश टक्क्यांनी वधारला. दक्षिण कोरियाच्या शेअर बाजाराचा कोस्पी हा निर्देशांक १ पूर्णांक ७० शतांश टक्क्यांनी वधारला तर मिडकॅप कोस्डॅक हा २ पूर्णांक ३५ शतांश टक्क्यांनी वधारला. हाँगकाँगचा हँग सेंग हा निर्देशांक ३ टक्क्यांनी वधारला आहे. भारतीय शेअर बाजारही कालच्या तुलनेने सावरला आहे. सेन्सेक्स आज दुपारपर्यंत २ पूर्णांक ३ शतांश टक्क्यांनी वधारला असून निफ्टी २ पूर्णांक १४ शतांश टक्क्यांनी वधारला आहे.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सध्या परदेश दौऱ्यावर आहेत. या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात पोर्तुगालमध्ये काल त्यांनी लिस्बन इथं पोर्तुगालचे राष्ट्राध्यक्ष मार्सेलो रेबेलो डीसूझा यांच्याशी शिष्टमंडळ स्तरीय चर्चा केली. भारत-पोर्तुगाल राजनैतिक संबंधांना ५० वर्ष पूर्ण होत असल्यानिमित्त काढण्यात आलेल्या विशेष टपाल तिकिटाचं राष्ट्रपती मुर्मू आणि अध्यक्ष रेबेलो डीसूझा यांच्या उपस्थितीत प्रकाशन करण्यात आलं. लिस्बनच्या महापौरांनी राष्ट्रपतींना काल की ऑफ ऑनर देऊन त्यांचा सत्कार केला. राष्ट्रपती मुर्मू यांनी आज लिस्बन इथल्या भारतीय समुदायाला संबोधित करणार आहेत, तसंच त्या पोर्तुगालचे प्रधानमंत्री आणि पोर्तुगीज संसदेच्या सभापतींचीही भेट घेणार आहेत. उद्या आणि परवा म्हणजे ९

आणि १० तारखेला त्या स्लोव्हाकियाच्या दौऱ्यावर जाणार आहेत. भारताच्या राष्ट्रपतींनी स्लोव्हाकियाला भेट देण्याची गेल्या २९ वर्षातील ही पहिलीच वेळ आहे.

<><><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आजपासून सहा दिवस इंग्लंड आणि ऑस्ट्रियाच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यासाठी त्या काल रात्री लंडन इथं पोहोचल्या. भारताचे इंग्लंडमधील उच्चायुक्त विक्रम दोरायस्वामी यांनी त्यांचं हिथ्रो विमानतळावर स्वागत केलं. आज त्या भारतीय उच्चायुक्तालयानं लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या सहकार्यानं आयोजित केलेल्या वार्तालाप सत्रात सहभागी होऊन या दौऱ्याचा प्रारंभ करतील. त्यानंतर उद्या त्या त्यांच्या ब्रिटिश समपदस्थ चॅन्सेलर रॅचेल रीव्ह यांच्यामवेत भारत-युके आर्थिक -वित्तीय संवादाच्या १३ व्या मंत्रीस्तरीय फेरीत सहभागी होतील.

<><><><><>

२००८ मध्ये मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यातला आरोपी तहव्वूर राणाच्या प्रत्यापर्णाचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रत्यार्पणाला स्थगिती देण्याची मागणी करणारा त्याचा अर्ज अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयानं फेटाळला आहे. तहव्वूर राणा पाकिस्तानी वंशाचा कॅनेडियन नागरिक असून सध्या तो लॉस एंजेलिस मधे डिटेन्शन सेंटरमध्ये आहे. भारत आणि अमेरिका यांच्यात १९९७ मध्ये झालेल्या प्रत्यार्पण करारानुसार त्याला भारताच्या ताब्यात दिलं जाणार आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकाता नाईट रायडर्स आणि लखनौ सुपर जायंट्स यांची लढत होणार आहे. कोलकात्याच्या ईडन गार्डन्स मैदानावर दुपारी साडेतीन वाजता सामन्याला सुरुवात होईल. दोन्ही संघांनी आतापर्यंत प्रत्येकी दोन सामने जिंकल्यामुळे दोन्ही संघ तुल्यबळ आहेत. स्पर्धेतला आजचा

दुसरा सामना संध्याकाळी साडेसात वाजता चेन्नई सुपर किंग्ज आणि पंजाब किंग्ज यांच्यात होणार आहे. सलग तीनही सामने गमावलेल्या चेन्नईसाठी हा सामना महत्वाचा आहे. काल मुंबईत झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगलोर संघानं मुंबई इंडियन्स संघावर १२ धावांनी विजय मिळवला.

**<><><><><><>**

भारतीय हवामान विभागाने आज राजस्थान, सौराष्ट्र आणि कच्छमध्ये उष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट जारी केला आहे. येत्या दोन ते तीन दिवसात हरयाणा, चंडिगढ, पश्चिम मध्य प्रदेश, गुजरात, पंजाब, पश्चिम उत्तर प्रदेश, विदर्भ आणि पूर्व मध्य प्रदेशातही उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातही अनेक भागात कमाल तापमानात २ ते ३ अंशांची वाढ होण्याचा अंदाज विभागाने वर्तवला आहे. मात्र, आसाम, मेघालय, तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल, केरळ आणि माहे इथे आज मुसळधार पाऊस पडण्याची शक्यताही हवामान विभागाने वर्तवली आहे.

**//<><><><><><>//**